आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२५

ठळक बातम्या

1. अतिवृष्टी बाधित जिल्ह्यांसाठी आणखी तेराशे कोटींच्या मदतीचा शासन निर्णय जारी.
2. सरकारच्या तुटपुंज्या मदतीने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात असल्याची काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांची टिका.
3. नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते आज लोकार्पण.
4. नागपुरात 7 ते 18 नोव्हेंबरदरम्यान खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या १०व्या पर्वाचं आयोजन.

१३०० कोटींची मदत

गेल्या महिन्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे बाधित झालेल्या जिल्ह्यांसाठी एक हजार ३५६ कोटी रुपयांची मदत मंजूर झाल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली आहे. सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड या जिल्हांमधल्या २१ लाख ६६ हजार १९८ शेतकऱ्यांच्या १५ लाख १६ हजार ६८१ हेक्टरहून अधिक बाधित पिकांसाठी ही मदत मिळेल. यासाठीचा शासन निर्णय झाल्याचं त्यांनी पत्रकाद्वारे म्हटलं आहे. या आपत्तीत मृत्यूमूखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना, ज्यांच्या पशुधनाचे नुकसान झाले त्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना जिल्हास्तरावरुन मदत दिली जाणार आहे. यामुळे या मदतीचं वितरण ताबडतोब होईल, असंही मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केलं.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदतनिधी मिळावा, यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. ज्यांची केवायसी प्रक्रिया पूर्ण झाली आहे, त्या शेतकऱ्यांच्या खात्यात निधी जमा करण्यासाठी महसूल विभाग सुट्टीतही काम करणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपुरात दिली.

विजय वडेट्टीवार

राज्य सरकारनं शेतकऱ्यांसाठी 31 हजार कोटींच्या मदतीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्षात केवळ 1800 कोटींच्या मदतीचे जीआर जारी झाले आहेत, अशी टीका काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. सरकारने दिलेली हेक्टरी 10 हजार रुपयांची मदत तुटपुंजी असून ही शेतकऱ्यांची फसवणूक आहे, असं ते नागपुरात पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले –

*नऊ तारखेच्या जीआरमध्ये ज्या सवलती होत्या 10ऑक्टोबरला दुसर्या दिवशी पुन्हा एक जीआर काढला त्यामध्ये या सवलतीचा कुठेही उल्लेख नाही. म्हणजेचं लोकांच्यापुढे एक वेगळा मांडायचं आणि शेतकर्याची फसवणूक करायची आणि दुसरीकडे मात्र वस्तुस्थिती वेगळी असायची या संदर्भात अद्यापही केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव एनडीआरएफच्या मदतीतून गेला नसल्याची माझ्याकडे माहिती आहे.*

राज्यातील 253 तालुक्यांमध्ये अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असूनही मदत एनडीआरएफच्या जुन्या निकषांप्रमाणेच दिली गेली आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी खरवडल्या आहेत त्यांना मिळणारी मदत तीन वर्षांनी मिळणार असल्यानं तोपर्यंत शेतकरी कसा जगणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. वडेट्टीवार यांनी शेतकऱ्यांना काळी दिवाळी साजरी करून सरकारचा निषेध करण्याचं आवाहन केलं. दरम्यान, मराठवाड्यात सुरू असलेल्या ओबीसी समाजाच्या मोर्चाला त्यांनी शुभेच्छा दिल्या आणि २ सप्टेंबरचा जीआर रद्द करण्याची जबाबदारी सरकारमधील मंत्र्यांवर असल्याचं सांगितलं. तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांची सूत्रे पणन मंत्र्यांच्या हातात देण्यावर देखील त्यांनी टीका केली.

**राष्ट्रवादी काँग्रेस**

राज्यातील अतिवृष्टी आणि पुरामुळं शेतकऱ्यांचं झालेलं प्रचंड नुकसान लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि सर्व पदाधिकारी यांच्या बैठकीत घेण्यात आला, अशी माहिती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी बारामती इथं दिली. गेल्या महिनाभरात अनेक जिल्ह्यांमध्ये पूर आणि अतिवृष्टीमुळे शेती उद्ध्वस्त झाली. त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी आनंदाची नव्हे, तर वेदनेची ठरली आहे. या दुःखात आमच्या पक्षानं सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे, असं पवार यांनी स्पष्ट केलं.

**राजनाथ सिंह**

नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस विमानाचं लोकार्पण आज संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. ओझरमधल्या हिंदुस्थान एअरोनॉटिक्सच्या कारखान्यात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी तेजस एमके वन ए या लढाऊ विमानाच्या उत्पादन साखळीचंही लोकार्पण केलं. भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला.

*हमारी सबसे बड़ी समस्या यह थी कि हमारा डिफेन्स प्रीपेडनेस बहोत लिमिटेड था और हम इम्पॉर्टन्ट मिलिटरी हार्डवेअर के लिये लगभग पुरी तरह इंपोर्टस पर निर्भर हुआ करते थे हमारे डिफेन्स प्रोडक्शन सिस्टिम मे प्राव्हेट इंडस्ट्रियल सेक्टर्स कि भी कोई खास भागीदारी नही थी सबकुछ केवल पब्लिक सेक्टर पीएसयू तक सीमित था यहि कारण कि क्रिटिकल इक्युपमेन्ट और कटिंग एज सिस्टिम के लिये हमें बाहरी देशो कि ओर नजर उठाकर देखणा पडता था जिससे ना केवल कॉस्ट'बढती थी बल्की स्ट्रॅटेजिक व्हॉल्व्हरेटी भी पैदा होती थी.*

नाशिकमध्ये तयार झालेल्या सुखोई-३०, एलसीए आणि एचटीटी-४० विमानांच्या उड्डाणांचं राजनाथ सिंह यांनी कौतुक केलं. हे उड्डाण देशाच्या स्वावलंबनाचं उड्डाण असल्याचं ते यावेळी म्हणाले. २०१४ पूर्वी जवळपास ६५ ते ७० टक्के संरक्षण सामग्री आयात केली जात होती. मात्र आता जवळपास ६५ टक्के उत्पादनं देशात तयार होत असल्याचं ते म्हणाले.

**वसुबारस**

आज वसुबारस. सवत्स धेनू अर्थात गायवासराच्या पूजेनं दिवाळीला आजपासून प्रारंभ होतो. शेतकऱ्यांना दूध आणि शेतात कष्टासाठी बैलासारखा मेहनती पशू देणाऱ्या गायीप्रति कृतज्ञता म्हणून हा सण साजरा केला जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरिकांना दीपोत्सवाचा आरंभ होताना वसुबारसेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

## एयर चीफ मार्शल ए.पी.सिंह

हवाईदलातल्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दर्जा, व्यावसायिकता, सुरक्षा आणि कार्यक्षमता यासाठी कायम वचनबद्ध रहावं. त्यातूनच देशाच्या हवाई रक्षणासाठी भारतीय हवाई दल प्रभावीरित्या कार्यरत राहू शकेल, असं हवाई दल प्रमुख ए. पी. सिंग यांनी आज सांगितलं. नागपुरात हवाई दलाच्या देखरेख विभागात आयोजित कमांडर परिषदेत ते बोलत होते. तांत्रिक क्षमतांचा देशांतर्गत विकास करणं या विषयावर ही दोन दिवसीय परिषद आयोजिण्यात आली होती.

## खासदार सांस्कृतिक महोत्सव

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाचं यंदा दहावं पर्व आहे. यंदा खासदार सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन 7 ते 18 नोव्हेंबर दरम्यान हनुमाननगर इथल्या ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. उद्घाटन 7 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6.30 वाजता स्वामी गोविंद देवगिरी महाराज यांच्या हस्ते होणार असून, लेखक-दिग्दर्शक पद्मश्री डॉ.चंद्रप्रकाश द्विवेदी आणि अभिनेते आशुतोष राणा यावेळी उपस्थित राहतील. बारा दिवस चालणाऱ्या या सोहळयात गायिका श्रेया घोषाल, संगीतकार शंकर महादेवन, विशाल मिश्रा, अजय-अतुल यांसारखे नामांकित कलाकार सादरीकरण करतील.

*आपल्या जनतेचं केवळ मनोरंजन नाही तर प्रबोधन पण झालं पाहिजे या भावनेतून आपण हा कार्यक्रम केला. याच्यामध्ये बालक , महिला युवक जेष्ठ नागरिक ट्रान्सजेन्डर, दिव्यांग अशा सगळयाना आपण सहभागी केला. पण चांगले विचार चांगले संस्कार आपल्या नवीन पिढीमध्ये निर्माण होण्याचा प्रयत्न, संगीत, नृत्य, नाट्य, भजन, गायन, कीर्तन, प्रवचन कवी संमेलन, लोककला यांचा संगम असलेला महोत्सवात केवळ राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय कलाकार नाही तर स्थानिक कलाकारांना आपण प्रोत्साहान दिलं*

9 नोव्हेंबरला ‘फ्यूजन’, 11 तारखेला ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ आणि 15 नोव्हेम्बरला अखिल भारतीय हिंदी कविसंमेलन होईल. 10 नोव्हेंबरला ‘राष्ट्रसंतांची जीवनगाथा’ आणि 13 नोव्हेंबरला ‘मिट्टी के रंग’ हे विशेष कार्यक्रम सादर होतील. 8 ते 17 नोव्हेंबरदरम्यान दररोज सकाळी ‘जागर भक्तीचा’ या उपक्रमांतर्गत पन्नास हजार विद्यार्थी भगवद्गीतेचं सामूहिक पठण करतील. प्रेक्षकांसाठी मोफत पासेस www.khasdarmahotsav.com या संकेतस्थळावरून मिळणार आहेत. मागील वर्षी दोन कोटी लोकांनी महोत्सवातील कार्यक्रमांचा आनंद घेतला होता.

## शिवाजीराव कर्डिले

अहल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचं आज अल्पशा आजारानं आकस्मिक निधन झालं. ते ६५ वर्षाचे होते. कर्डिले हे वर्षभरापूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत राहुरी विधानसभा मतदारसंघातून विजयी झाले होते. १९९५ मध्ये युती सरकारच्या काळात त्यांनी राज्यमंत्री म्हणूनही काम पाहिलं होतं. नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते विद्यमान अध्यक्ष होते.

**नक्षल आत्मसमर्पण**

छत्तीसगढ राज्यात जगदलपूर इथं आज २०८ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यात ९८ पुरुष आणि ११० महिलांचा समावेश आहे. नक्षलवाद निर्मूलनाच्या दिशेनं हे मोठं यश आहे. हिंसेचा मार्ग सोडत, आपल्याजवळची १५३ हत्यारं खाली टाकत या नक्षलवाद्यांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला असून, त्यांना आता सरकारच्या पुनर्वसन योजनांचा लाभ मिळणार आहे.

**हवामान**

येत्या काही तासात नागपूर, गोंदिया आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलक्या सरींची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं वर्तवली आहे.

*****